नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०४/०५/२०२६ (सोमवार )

# ८ तासात जबरी चोरीचा गुन्हा उघड
# २ आरोपी अटक, ०९ लाख ९० हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त
# स्थानिक गुन्हे शाखा आणि केळवद पोलीसांची संयुक्त कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद**:—पोलीस स्टेशन केळवद अंतर्गत फिर्यादी नामे प्रणय गिरीधर हिवरकर, वय २५ वर्ष, रा. तेलंगखेडी, ता. सावनेर जि. नागपुर यांनी तक्रार दिली की, फिर्यादी व कॅमेरा ऑपरेटर गौरव रुपचंद गायधने हे सोबत लग्नाचे ऑर्डर असल्याने दि ०२/०५/२०२६ रोजी अंदाजे रात्रीचे १२/१५ वा. बोरगांव रेमंड येथुन फिर्यादी सोबत गौरव रुपचंद गायधने याचे मो.सा.क्र. एम.एच. ४० ए.जे. ५३४० वर छिंदवाडा नागपूर मार्गे परत येत असतांना मध्यरात्री १२/४५ वाजेच्या सुमारास रामपुरी फाट्यावरुन काही अंतरावर रामपुरी गावाच्या दिशेने जात असतांना कार क्रं. एम.पी. २८ झेड ए ६१३५ ही अचानक फिर्यादीचे मोटार सायकल समोर येवुन फिर्यादीला अडवुन कार मधुन चार अज्ञान आरोपींनी फिर्यादीच्या हातातील कॅमेऱ्याची बॅग ज्यामध्ये १) Canon R कॅमेरा किमंती ४०,०००/— रुपये आणि २) Canon R6 mark २ कंपनीचा कॅमेरा किंमती १,५०,०००/— रु. असा एकुण १,९०,००० रु. चा मुददेमाल असलेली कॅमेरावाली बॅग जबरदस्तीने हिसकावुन नेली फिर्यादीचे तोंडी रीपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे अपराध क्रमांक कलम ३०९(४), ३(५), भान्यासं अन्वये गुन्हा नोंद आहे.

मा. श्री. हर्ष पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक,

यांच्या मार्गदर्शनात केळवद पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांनी संयुक्त रित्या तपास करीत दिनांक ०२/०५/२०२६ रोजी गोपनीय बातमी दाराकडून मिळालेली माहीती तसेच सायबर पोलीस स्टेशन नागपुर ग्रामीण यांच्या कडुन प्राप्त तांत्रिक पुराव्यावरून मिळालेल्या माहितीचे आधारे सदर गुन्हयात वापरलेली टाटा अल्ट्रोज कार क्र. एम पी २८ झेड ए ६१३५ या वाहनासह **आरोपी क्रं १) रिषभ अशोक नंदनवार, वय २६ वर्ष, रा. गोरया रोड, बजरंग नगर दुर्गा मंदीर जवळ छिंदवाडा मध्यप्रदेश आणि आरोपी क्रं २) सौरभ महेश पाल, वय २५ वर्ष, रा. पुराणा छापखाना कबीरवाळा हनुमान मंदीरा जवळ छिंदवाडा मध्यप्रदेश** यांना जिल्हा जेल परिसर छिंदवाडा, जवळील बस स्थानका जवळुन ताब्यात घेतले. सदर कारची झडती घेतली असता कारचे डिक्की मध्ये १) Canon R कंपनी चा कॅमेरा २) Canon R 6 Mark 2 कंपनीचा कॅमेरा असे कॅमेरे मिळुन आले. सदर आरोपींकडे कौशल्य पूर्ण विचारपूस केली असता त्याने त्याच्या साथीदारासह सदर कॅमेरे हे केळवद परिसरातून जबरीने हिसकावुन आणल्याचे सांगितले. **अवघ्या ८ तसात पोलीसांनी जबरी चोरीचा गुन्हा उघड करून संपुर्ण चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) Canon R कंपनीचा कॅमेरा किंमती ४०,०००/— रूपये २) Canon R 6 Mark 2 कंपनीचा कॅमेरा किंमती १,५०,०००/— रूपये ३) टाटा अल्ट्रोज कार क्र. एम पी—२८ झेड ए ६१३५ किंमती ८,००,०००/— रूपये असा एकुण ९,९०,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.दोन्ही आरोपींना अटक केलेली आहे. पुढील तपास केळवद पोलीस करीत आहेत.**




**गुन्हा उघड करणारे पोलीस पथक जप्त मुद्द्देमालासह**

## शेतीचे अवजारे चोरणारा आरोपी अटक, ३ गुन्हे उघडकीस, वाहनासह ०३ लाख ६७ हजार रूपयाचा मुद्द्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक ०३/०५/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रामटेक उपविभागात उघड न झालेल्या गुन्हयांचा तपास करीत असतांना त्यांना गुप्तबातमीदाराकडुन माहीती मिळाली की, **आरोपी नामे रामप्रसाद रिकीराम राय रा.चिडिया**

**पलारी, जि. शिवनी याने रामटेक परीसरात शेतशिवारात शेती उपयोगाकरिता येणाऱ्या लोखंडी साहित्य चोरीचे गुन्हे केलेले आहे.**

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०३/०५/२०२६ रोजी सायबर पोलीस स्टेशन नागपुर ग्रामीण यांच्या कडुन प्राप्त तांत्रिक पुरावे आणि गोपनिय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने **आरोपी नामे रामप्रसाद रिकीराम राय, वय ३२ वर्षे, रा. चिडिया पलारी, जि. शिवनी (मध्य प्रदेश) यास कन्हान टेकाडी** येथुन ताब्यात घेतले. नमुद आरोपीला पोलीसांनी कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी रामटेक पोलीस स्टेशन हद्दीत कवळक शेतशिवार येथील शेतात आणि सोनेघाट शेतशिवार येथील दोन शेतातुन शेती उपयोगाकरिता येणाऱ्या लोखंडी साहित्य चोरीचे ३ गुन्हे केलेले आहे.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) गुन्हयात वापरलेले वाहन महिंद्रा बोलेरो क्र. एम एच–२९/बी इ २१३५ किंमती ३,००,०००/–रूपये २) शेतीच्या उपयोगाकरिता येणाऱ्या साहित्याची विक्री करून मिळविलेले रोख रक्कम ६७,०००/–रूपये असा एकूण ३,६७,०००/– रुपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे.**

**उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे आहे.**

१) पोस्टे रामटेक अप क्रमांक ४१३/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं.
२) पोस्टे रामटेक अप क्रमांक ३९०/२०२६ कलम ३३४(१),३०५(अं)भा.न्या.सं.
३) पोस्टे रामटेक अप क्रमांक ३४३/२०२६ कलम ३३४(१),३०५(अं)भा.न्या.सं.




गुन्हा उघड करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह

# अल्पवयीन बालीकेचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला मा न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पोलीस स्टेशन मौदा** :— अल्पवयीन फिर्यादी हीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मौदा येथे अप क्र. ६४७/२०२४ कलम ३५४(अ), ३५४(ड),५०९ भादवी सहक. १२ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद झालेला होता. सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक २१/०६/२०२४ रोजी यातील **आरोपी नामे नितेश उर्फ अतुल शिवाजी गोमासे, वय २७ वर्षे, रा. पानमारा, ता. मौदा, जि. नागपुर** याने सदर गुन्हयातील अल्पवयीन पिडीत/ फिर्यादीचा पाठलाग करून फिर्यादीला अश्लिल शब्दात बोलुन तिचा विनयभंग केला.

श्री महेश बोथले, पोलीस उपनिरीक्षक, नेम पोलीस स्टेशन मौदा यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. **दिनांक ०४/०५/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं १९ श्रीमती एच. ए. अन्सारी यांनी नमुद आरोपी नामे नितेश उर्फ अतुल शिवाजी गोमासे, वय २७ वर्षे, रा. पानमारा, ता. मौदा, जि. नागपुर यास कलम ३५४ (अ), ५०९ भादवि सह कलम १२ पोक्सो मध्ये दोषी ठरवुन त्याला कलम १२ पोक्सो अन्वये १ वर्ष सश्रम कारावास व २००० /— रूपये दंड , दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री पंकज तपासे यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री. सारिन दुर्गे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन मौदा , पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सपोनि श्री विशांत नांदगाये, पोहवा श्री गणेश भुरे, ब.नं १५८२, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार पोअं राजेंद्र पारधी ब. नं. ७११ यांनी मदत केली आहे.

# अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
# ११ गोवंश जनावरांची सुटका, बेला पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बेला** :— दिनांक ०३/०५/२०२६ रोजी बेला पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, उमरेड मार्गे अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तली करीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा महालगाव शिवारातील भारत पेट्रोल पंपचे समोरील रोडवर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान टाटा कंपनीचा ६ चक्का आयसर ट्रक क्र. एम एच—४५/ए एफ—०१९९ मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता चालक नामे **१) अविनाश पिराजी डिग्रसे, वय ३६ वर्ष, रा. पार्डी खुर्द, ता. वसमत जि. हिंगोली, आणि त्याचा साथीदार २) विशाल केशव खरे, वय २९ वर्ष, रा. सुभेदार रामजी आंबेडकर नगर, ता. वसमत जि. हिंगोली** हे मिळुन आले. पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ११ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन, वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळा वरून टाटा कंपनीचा ६ चक्का आयसर ट्रक क्र. एम एच—४५/ए एफ—०१९९ किंमती १२,००,०००/—रूपये आणि ११ गोवंश जनावरे किंमती १,११,०००/—रूपये असा एकुण १३,११,०००/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नुमद प्रकरणी आरोपी क्रं १) अविनाश पिराजी डिग्रसे, वय ३६ वर्ष, रा. पार्डी खुर्द, ता. वसमत जि. हिंगोली आणि क्रं २) विशाल केशव खरे, वय २९ वर्ष, रा. सुभेदार रामजी आंबेडकर नगर, ता. वसमत जि. हिंगोली याचे विरूद्ध कलम ३२५, ३(५) भा.न्या. सं., सहकलम प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम, सहकलम महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, सहकलम मु.पो.का, सहकलम मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद ०५ गोवंश जनावरांची सुटका, वडोदा पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन वडोदा:— दिनांक ०३/०५/२०२६ रोजी वडोदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, भंडारा नागपूर रोडने अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी भंडारा नागपूर रोड, एन एच ५३, मौजा गुमथळा शिवार येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान बोलेरो पिकअप वाहन क्र. एम एच ४९/ए टी ८५४१ मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता चालक नामे **सागर ज्ञानेश्वर बोंद्रे, वय २२ वर्ष, रा. इंदीरा नगर, खात ता. मौदा, जि. नागपूर** हा मिळुन आला. पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ५गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून बोलेरो पिकअप वाहन क्र. एम एच—४९/ए टी—८५४१ किंमती ४,००,०००/—रूपये आणि ५ गोवंश जनावरे किंमती ५०,०००/—रूपये असा एकुण ४,५०,०००/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.नुमद प्रकरणी आरोपी सागर ज्ञानेश्वर बोंद्रे, वय २२ वर्ष, रा. इंदीरा नगर, खात ता. मौदा, जि. नागपूर याचे विरूद्ध प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**



कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने